# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

डॉ. संजयकुमार दळवी
एम.एससी., पीएच.डी.
प्र. कार्यक्रम समन्वयक

कार्यालय क्र. : ०२०-२५६९०३४१
०२०-२५६०११५३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९०३४१


संदर्भ: रासेयो/ १५७ /२०१४

दि. १९ सप्टेंबर २०१४

प्रति
मा.प्राचार्य / कार्यक्रम अधिकारी,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

विषय :– रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रमाणपत्राबाबत...

महोदय,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील ३५० महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत ५०० रासेयो कार्यक्रम अधिकारी व ४५००० स्वयंसेवक यांच्या सहकार्याने विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. **सलग तीन वर्षे कार्यक्रम अधिकारी म्हणून काम केल्यानंतर सदर प्राध्यापकांना विद्यापीठामार्फत प्रमाणपत्र देण्यात येते.**

१. उपरोक्त विषयास अनुसरून सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागास रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रमाणपत्र मागणी करतांना कार्यक्रम अधिकारी म्हणून कमीत कमी तीन वर्षे कार्यक्रम अधिकारी असणे आवश्यक आहे. तसेच प्रमाणपत्र मागणी करतांना अर्जासोबत खालीलप्रमाणे सर्व आवश्यक कागदपत्रे **(मा. प्राचार्य यांच्या सहीने सांक्षांकित करून)** जोडणे आवश्यक आहे.

२. रासेयो कार्यक्रम अधिकारी म्हणून तीन वर्ष (कालावधी नमूद करावे) काम केल्याचे मा. प्राचार्य यांचे पत्र.

३. रासेयो उद्बोधन वर्ग प्रशिक्षण (NSS E.T.I. Ahmednagar येथील) पूर्ण केल्याचे प्रमाणपत्राची छायांकित प्रत.

४. नमूद केलेल्या कालावधीतील विद्यापीठाने दिलेले कार्यक्रम अधिकारी मान्यता पत्राची छायांकित प्रत.

५. कार्यक्रम अधिकारी कालावधीत कार्यक्रम अधिकारी यांनी रासेयो अंतर्गत केलेल्या कामाचा मा. प्राचार्यांनी प्रमाणित केलेला अहवाल इ.

P.T.O.

वरीलप्रमाणे कागदपत्रे प्रत्यक्ष सादर केल्यानंतर त्वरीत आपणांस रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रमाणपत्र देण्यात येईल.

तसेच सन २०१४—१५ या शैक्षणिक वर्षात संदर्भ क्र १०१/२०१४, दि. ३० जुलै २०१४ या मान्यता पत्रानुसार आंपल्या महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकारी यांनी NSS ETI. Ahmednagar येथील उद्‌बोधन वर्ग प्रशिक्षण सहा महिन्याच्या आत पूर्ण करून रासेयो कार्यालयास कळविणे आवश्यक आहे. उद्‌बोधन वर्ग संदर्भात सविस्तर वेळापत्रक रासेयोच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

कळावे.

आपला विश्वासू

प्र.कार्यक्रम समन्वयक,
राष्ट्रीय सेवा योजना